तरुण भारत

# सदाफुली

https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com

बुधवार, ९ जुलै २०२५

आतील पानावर

पान २– 'अजेय' सिनेमाचा टीझर आऊट
पान ३– कार्तिक श्रीलीलाची डिनर डेट व्हायरल
पान ४– मौसात रश्मिकाचा थराराक लूक
पान ५– 'धमाल ४'मध्ये ईशा गुप्ताची एंट्री
पान ६– मृण्मयी देशपांडे दिग्दर्शकाच्या भूमिकेत

बॉलिवूडची 'मस्तानी' दीपिका पादुकोण ही लोकप्रिय अभिनेत्रींपैकी एक आहे. आपल्या प्रभावी अभिनयाने आणि अष्टपैलू योगदानाने केवळ भारतीय सिनेसृष्टीत नव्हे तर जागतिक स्तरावर स्वतःचं अढळ स्थान निर्माण केलंय. ती केवळ एक स्टार नाही तर एक जागतिक आयकॉन बनली आहे. आता पुन्हा एकदा दीपिकानं आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताचं नाव उंचावलं आहे. दीपिकाचा हॉलिवूड चेंबर ऑफ कॉमर्सने 'हॉलिवूड वॉक ऑफ फेम'मध्ये 'स्टार'नं गौरव केला आहे. विशेष म्हणजे, हा सन्मान मिळवणारी ती एकमेव भारतीय बनली आहे. दीपिका पदुकोणसोबत यंदा 'हॉलिवूड वॉक ऑफ फेम'मध्ये समाविष्ट झालेल्या कलाकारांमध्ये एमिली ब्लंट, राचेल मॅकअ‍ॅडम्स, डेमी मूर, रामी मालेक, टिमोथी चालमेट आणि स्टॅनली टुची यांसारख्या दिग्गजांची नावं आहेत. या प्रतिष्ठित सन्मानासाठीची निवड प्रक्रिया अत्यंत कठीण असते. दरवर्षी शेकडो नामांकने येतात, मात्र त्यामधून केवळ मोजक्याच कलाकारांची निवड त्यांचं योगदानाच्या आधारे केली जाते. दीपिकाने अनेक वेळा देशाचं नाव उंचावलं आहे. २०१८ मध्ये टाइम मासिकाने तिला जगातील १०० सर्वात प्रभावशाली व्यक्तींमध्ये स्थान दिलं होतं. त्यानंतर तिला TIME १०० इम्पॅक्ट पुरस्कारही मिळाला होता. त्यानंतर कतारमध्ये झालेल्या 'फिफा वर्ल्ड कप'च्या अंतिम फेरीत ट्रॉफीचे अनावरण करून तिने एक नवा इतिहास रचला होता आणि असं करणारी ती पहिली भारतीय ठरली होती. आंतरराष्ट्रीय स्तरावरील सन्मानाव्यतिरिक्त, दीपिका मनोरंजन जगतात सतत वर्चस्व गाजवतेय. तिच्याकडे अनेक मोठे प्रकल्प असून बॉक्स ऑफिसवर तिची पकड मजबूत आहे. लवकरच ती दिग्दर्शक टली कुमारच्या चित्रपटात ती थेट अल्लू अर्जूनसोबत दिसणार आहे.



# दीपिकानं देशाची मान उंचावली



# ‘अजेय’ सिनेमाचा टीझर आऊट



उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री असलेल्या योगी आदित्यनाथ हे भारताच्या राजकारणातील महत्वाचं नाव आहे. योगी आदित्यनाथ यांच्यावरील बायोपिकची घोषणा काही महिन्यांपूर्वीच करण्यात आली. सिनेमाची पहिली झलकही समोर आली होती. आता योगी आदित्यनाथ यांच्यावरील 'अजेय' या सिनेमाचा टीझर प्रदर्शित करण्यात आला असून रिलीज डेटही जाहीर करण्यात आली आहे.

योगी आदित्यनाथ यांच्यावरील 'अजेय' या सिनेमाचा टीझर १.१६ मिनिटांचा आहे. यामध्ये योगी आदित्यनाथ यांचे एक सो एक डायलॉग ऐकायला मिळत आहेत. मुझे नेताओं की तरह बात करना नही आता, आप सबको एक भयमुक्त प्रदेश देने के लिए माफियों का उनके घुटनों पर लाके उनसे माफी मगवाऊंगा, बाबा आते नही प्रकट होते है हे संवाद लक्ष वेधून घेत आहेत. सिनेमाच्या टीझरमध्ये योगी आदित्यनाथ यांचा योगीपासून ते नेता बनण्याच्या प्रवासाची एक झलक पाहायला मिळत आहे. '12 th फेल' फेम अभिनेता अनंत जोशी या सिनेमात योगी आदित्यनाथ यांच्या भूमिकेत झळकणार आहे. अनंत जोशीचा जबरदस्त लूक टीझरमध्ये पाहायला मिळतोय. याशिवाय 'अजेय' सिनेमात परेश रावल आणि भोजपुरीतील प्रसिद्ध अभिनेता निरहूआ महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहेत.

योगी आदित्यनाथ यांचा जीवनप्रवास 'अजेय' सिनेमातून उलगडणार आहे. हा सिनेमा शांतनु गुप्ता यांचं बेस्टसेलर पुस्तक 'द मॉन्क हू बिकेम चीफ मिनिस्टर' यावर आधारीत आहे. रविंद्र गौतम यांनी या सिनेमाचं दिग्दर्शन केलं आहे. अनंत जोशी, परेश रावल, निरहूआ यांच्यासोबत सिनेमात अजय मेंगी, पवन मल्होत्रा, राजेश खट्टर, गरिमा सिंह हे कलाकारही झळकणार आहेत. येत्या १ ऑगस्टला सिनेमा चित्रपटगृहात प्रदर्शित केला जाणार आहे.

# ‘बजरंगी भाईजान’ मधील मुन्नीचं साउथमध्ये पदार्पण!

कबीर खान दिग्दर्शित 'बजरंगी भाईजान' या चित्रपटाची क्रेझ आजही चाहत्यांमध्ये आहे. २०१५ साली प्रदर्शित झालेला हा चित्रपटात सलमान खान आणि करीना कपूरची मुख्य भूमिका होती. या चित्रपटात मुन्नीची भूमिका साकारून बालकलाकार हर्षाली मल्होत्राने प्रेक्षकांची मनं जिंकली. निरागस चेहरा आणि स्मित हास्याने अनेकांनी भुरळ घालणारी हर्षाली आता नव्या चित्रपटाच्या माध्यमातून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. नुकतीच तिच्या या आगामी चित्रपटाची घोषणा करण्यात आली आहे. दरम्यान, हर्षाली मल्होत्राच्या बजरंगी भाईजान या चित्रपटाला प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. तसेच अनेक समीक्षकांनी चित्रपटाची स्तुती केली. त्यानंतर आता हर्षालीने दाक्षिणात्य चित्रपटातून प्रेक्षकांचं मनोरंजन करण्यास सज्ज आहे. अखंडा-२ असं या चित्रपटाचं नाव आहे. या चित्रपटात ती जननीची भूमिका साकारताना दिसणार आहे. दाक्षिणात्य अभिनेते नंदमुरी बालकृष्ण हे या चित्रपटात मुख्य भूमिका साकारत आहेत. नुकताच या हर्षालीचा चित्रपटातील पहिला लूक नुकताच समोर आला आहे. सोशल मीडियावर हर्षालीने तिच्या या आगामी चित्रपटाचं पोस्टर शेअर करत चाहत्यांसोबत गुडन्यूज शेअर केली आहे. 'अखंडा-२' च्या घोषणेनंतर, हर्षाली मल्होत्रा चर्चेत आली आहे. बजरंगी भाईजान नंतर, आता हर्षाली या बिग बजेट प्रोजेक्टमध्ये दिसणार आहे. हा चित्रपट दसऱ्याच्या शुभ मुहूर्तावर म्हणजेच येत्या २५ सप्टेंबर २०२५ रोजी हिंदी, तेलगू, तमिळ, कन्नड आणि मल्याळम अशा ५ भाषांमध्ये प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाच्या माध्यमातून हर्षाली मल्होत्रा जवळपास १० वर्षांनंतर अभिनय क्षेत्रात कमबॅक करते आहे.



# अजय देवगणचा ‘रेड २’ ओटीटीवर पाहता येणार




अभिनेता अजय देवगण आणि रितेश देशमुख यांची जोडी 'रेड २' चित्रपटात पाहायला मिळाली. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर मोठी कमाई केल्यानंतर आता हा चित्रपट ओटीटी प्लॅटफॉर्मवर रिलीज झाला आहे. राज कुमार गुप्ता दिग्दर्शित 'रेड २' हा २०१८ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'रेड' या सिनेमाचा सिक्वेल आहे. या चित्रपटाद्वारे अजय देवगण पुन्हा एकदा आयकर अधिकारी अमय पटनायकच्या भूमिकेत दिसला. त्याने आपल्या दमदार अभिनयाने पुन्हा एकदा प्रेक्षकांची मने जिंकली. हा चित्रपट २६ जून रोजी ओटीटी प्लॅटफॉर्म नेटफ्लिक्सवर प्रदर्शित झाला आहे. निर्मात्यांनी २५ जूनला पोस्ट करत यासंदर्भात माहिती दिली. निर्मात्यांनी बुधवारी रात्री त्यांच्या अधिकृत सोशल मीडिया हँडलवर 'रेड २' च्या ओटीटी रिलीजची घोषणा करत ट्रान्सफर कन्फर्म, आयआरएस अमय पटनायकच्या छाप्यासाठी तयार आहात? रेड २ पाहा, आता नेटफ्लिक्सवर, असे लिहिले आहे. 'रेड २' मध्ये अजय देवगण, रितेश देशमुख, वाणी कपूर आणि सौरभ शुक्ला यांनी महत्त्वाच्या भूमिका साकारल्या आहेत. राज कुमार गुप्ता दिग्दर्शित 'रेड २' १ मे २०२५ रोजी प्रदर्शित झाला. या चित्रपटात रितेश देशमुख खलनायकाच्या भूमिकेत दिसला होता. ४८ कोटी रुपयांचे बजेट असलेल्या 'रेड २' ने भारतात १७८.८ कोटींचे कलेक्शन केले. तर जगभरात २४३.०६ कोटी रुपयांची कमाई केली. यानंतर आता हा चित्रपट तुम्हाला घर बसल्या पाहता येणार आहे.




# 'द फॅमिली मॅन ३' नोव्हेंबरमध्ये येणार

मनोज वाजपेयी अन् प्रियमणी यांची मुख्य भूमिका असलेली सीरिज 'द फॅमिली मॅन' ही भारताच्या सर्वात लोकप्रिय सीरिजपैकी एक आहे. या सीरिजचे आतापर्यंत दोन सीझन आले असून त्यांना प्रेक्षकांकडून मोठी पसंती मिळाली आहे. सीरिजची कहाणी एक मध्यमवर्गीय इसम श्रीकांत तिवारीची असून तो एका तपास यंत्रणेच्या विशेष शाखेसाठी काम करत असतो. त्याच्यावर कामाच्या ताणासह परिवार चालविण्याचीही जबाबदारी आहे. आता या सीरिजचा तिसरा सीझन प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. द फॅमिली मॅनचा सीझन ३ हा नोव्हेंबर महिन्यात प्रेक्षकांच्या भेटीला येणार असल्याची माहिती मनोजने दिली आहे. परंतु निश्चित तारीख मात्र त्याने जाहीर करणे टाळले आहे. मागील दोन यशस्वी सीझनमध्ये यंदाही फॅमिली मॅन ३ ओटीटी प्लॅटफॉर्म अमेझॉन प्राइम व्हिडिओवरच प्रदर्शित होणार आहे. तिसऱ्या सीझनमध्ये जयदीप अहलावत हा कलाकार दिसून येणार आहे. तो या सीझनमध्ये मुख्य खलनायक असणार आहे. यामुळे या सीझनमध्ये पूर्वीपेक्षा अधिक ॲक्शन आणि ड्रामा प्रेक्षकांना पहायला मिळू शकतो.

# कार्तिक श्रीलीलाची डिनर डेट व्हायरल



गेल्या काही महिन्यांपासून बॉलिवूड अभिनेता कार्तिक आर्यन आणि दाक्षिणात्य अभिनेत्री श्रीलीला यांच्या अफेअरच्या चर्चा बीटाऊनमध्ये होत असतात. नुकतीच श्रीलीलाच्या वाढदिवसानिमित्ताने कार्तिकने तिला शुभेच्छा देणारी एक सुंदर पोस्ट लिहिली होती.

या पोस्टमध्ये त्याने श्रीलीलाचा फोटोही शेअर केला होता. अशातच आता सोशल मीडियावर एक व्हिडिओ व्हायरल झाला आहे. नुकतेच दोघांनाही रात्री उशिरा मुंबईतील एका प्रसिद्ध रेस्टॉरंटमधून बाहेर पडताना पापाराझींच्या कॅमेऱ्यात कैद झाले आहे. गेल्या काही दिवसांमध्ये दोघांनाही अनेकदा एकत्र पाहिले गेले आहे. या दोघांनीही प्रसिद्ध रेस्टॉरंटमध्ये एकत्र डिनर केला असल्याचे सांगण्यात आले आहे. या व्हायरल व्हिडीओवर चाहत्यांनी कमेंट बॉक्समध्ये मजेदार प्रतिक्रिया दिल्या आहेत. मीडिया रिपोर्टनुसार, कार्तिक आणि श्रीलीला हे दोघेही दिग्दर्शक अनुराग बसू यांच्या 'आशिकी ३' चित्रपटात एकत्र दिसणार आहेत. या रोमँटिक संगीतमय चित्रपटाच्या शूटिंगच्या तयारीला सुरूवात झाली आहे. त्यामुळे आजकाल हे दोघेही एकत्र दिसत आहेत. दोन्ही स्टार्सनी अद्याप त्यांच्या नात्याबद्दल कोणतेही अधिकृत प्रतिक्रिया दिली नसली तरी त्यांच्या अफेअरच्या चर्चा दिवसेंदिवस अधिक गहिऱ्या होताना दिसत आहेत.



# देसी गर्ल करणार बॉलिवूडमध्ये कमबॅक?

देसी गर्ल प्रियांका चोप्रा तिच्या 'हेड ऑफ स्टेट' या हॉलीवूड चित्रपटामुळे चर्चेत आहे. या चित्रपटाचे जोरदार प्रमोशन प्रियांका करत आहे. गेल्या काही दिवसांपूर्वी या चित्रपटाचे विशेष स्क्रिनिंग पार पडले. प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद चित्रपटाला मिळाला आहे. अशातच एका मुलाखती दरम्यान प्रियांकाने बॉलिवूड चित्रपटांची खूप आठवण येत असल्याचे विधान केले आहे. यामुळे आता ती लवकरच एका मोठ्या चित्रपटाद्वारे बॉलिवूडमध्ये धमाकेदार एन्ट्री करणार असल्याची चर्चा सुरु झाली आहे. बॉलिवूडची 'देसी गर्ल' हॉलीवूड चित्रपटांमध्येही आपल्या अभिनेयाच्या जोरावर प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेत आहे. नुकतीच एका मुलाखतीत तिने स्वतः कबूल केले की तिला बॉलिवूडची खूप आठवण येते आणि या वर्षी ती भारतात एका नवीन चित्रपटाचे चित्रीकरण देखील सुरू करणार आहे. प्रियांकाने, 'मला हिंदी चित्रपटांची आणि भारताचीही खूप आठवण येते.' असे म्हटले होते. प्रियांका भारतात ज्या प्रोजेक्ट्सबद्दल उत्सुक आहे, त्यात सर्वात मोठे नाव म्हणजे दिग्दर्शक एसएस राजामौली यांचा आगामी एसएसएमबी २९ या चित्रपटाचे आहे. या मेगा बजेट चित्रपटात तिच्यासोबत साऊथ सुपरस्टार महेश बाबू आणि पृथ्वीराज सुकुमारन दिसणार असल्याची माहिती आहे. हा एक पौराणिक थ्रिलर चित्रपट आहे. चित्रपटाच्या शुटिंगला या वर्षी ओडिशामध्ये सुरुवात होणार असल्याची माहिती आहे. याशिवाय प्रियांका फरहान अख्तरच्या बहुप्रतिक्षित 'जी ले जरा' या चित्रपटातही दिसू शकते, असे देखील सांगण्यात आले आहे.

# कनप्पासाठी मोहनलाल आणि प्रभास यांनी फुकटात केले काम



विष्णू मंचूचा बहुप्रतिक्षित 'कन्नप्पा' हा चित्रपट थिएटरमध्ये प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटाची बरीच चर्चा होती. या चित्रपटाच्या स्टारकास्टमुळे सर्वांनाच या चित्रपटाची उत्सुकता होती. मोहनलालपासून अक्षय कुमारपर्यंत या चित्रपटाची स्टारकास्ट खूप मोठी आहे. मोहनलाल, प्रभास, अक्षय कुमार, काजल अग्रवाल हे चित्रपटात महत्त्वाच्या भूमिका साकारताना दिसत आहेत. या स्टारने किती फी घेतली आहे ते आम्ही तुम्हाला सांगतो. चित्रपटात दोन सुपरस्टारने एकही फी घेतलेली नाही. कन्नप्पामध्ये अक्षय कुमार भगवान शिवाच्या भूमिकेत दिसला आहे. अक्षयचा लूक समोर आला तेव्हा सर्वजण त्याचे चाहते झाले. अक्षयने या चित्रपटासाठी मोठी रक्कम घेतली आहे. अक्षयने कन्नप्पासाठी ६ कोटी फी घेतली आहे. काजल अग्रवालने कन्नप्पामध्ये माता पार्वतीची भूमिका साकारली आहे. चित्रपटातील तिचा अभिनय खूप आवडला जात आहे. वृत्तांनुसार, काजलला चित्रपटासाठी २ कोटी रुपये फी मिळाली आहे. या चित्रपटात मोहनलालने एक रहस्यमय भूमिका साकारली आहे, तर प्रभास रुद्रच्या भूमिकेत दिसला आहे. वृत्तांनुसार, दोन्ही कलाकारांनी चित्रपटासाठी एकही पैसा घेतलेला नाही. विष्णू मंचू यांनी दिलेल्या मुलाखतीत म्हटले होते 'प्रभास आणि मोहनलाल यांनी फी घेतली नाही. पण चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर त्यांना त्यांच्या मेहनतीचे फळ द्यावे लागेल. मी त्यांचा ऋणी आहे.' वृत्तांनुसार, कन्नप्पा हा एक मोठा बजेटचा चित्रपट आहे. तो २०० कोटींच्या बजेटमध्ये बनवण्यात आला आहे. विष्णू मंचू यांनी चित्रपटावर पाण्यासारखे पैसे खर्च केले आहेत. हा चित्रपट रसिक प्रेक्षकांना खूप आवडला आहे.

# मी विजयसोबत रिलेशनशिपमध्ये नाही

अभिनेता विजय वर्मा हा तमन्ना भाटियासोबत दीर्घकाळ रिलेशनशिपमध्ये राहिला होता. विजय आणि तमन्नाच्या ब्रेकअपमुळे दोघांच्याही चाहत्यांना मोठा धक्का बसला होता. तर विजय पुन्हा प्रेमात पडल्याचा दावा करण्यात येत होता. विजयचे नाव अभिनेत्री फातिमा सना शेखसोबत जोडले होते. विजय आणि फातिमा यांना अलिकडेच एका कॅफेत एकत्र पाहिले गेले होते. यानंतर त्यांच्या रिलेशनशिपविषयी चर्चा सुरू झाली होती. तर या चर्चेला फातिमानेच पूर्ण विराम दिला आहे. विजय वर्मासोबत आपण रिलेशनशिपमध्ये नसल्याचे तिने स्पष्ट केले आहे. तसेच डेटिंगसाठी सध्या चांगले युवक भेटतात कुठे असे वक्तव्यही तिने केले आहे. विजय आणि फातिमा हे गुस्ताख इश्क या चित्रपटात काम करत आहेत. दोघांच्या या चित्रपटाचे पोस्टरही प्रदर्शित झाले आहे. विजय आणि तमन्ना हे लस्ट स्टोरी २ च्या सेटवर भेटले होते. यानंतर दोघेही रिलेशनशिपमध्ये होते. परंतु दोघांच्या ब्रेकअपचे कारण अद्याप समोर आलेले नाही. पण तमन्ना ही लवकर विवाहबद्ध होण्यासाठी आग्रही होती, तर विजयचा याला नकार होता असे समजते.





# मौसात रश्मिकाचा थरारक लूक

लोकप्रिय अभिनेत्री रश्मिका मंदाना सध्या तिच्या 'कुबेरा' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. अभिनेत्रीने या चित्रपटात महत्त्वपूर्ण भूमिका साकारली आहे. 'कुबेरा' हा चित्रपट २० जून रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित झाला आहे. तिच्या या चित्रपटाला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळत असलेला पाहायला मिळतोय. अशातच आता रश्मिकाच्या नव्या चित्रपटाची घोषणा झाली आहे. अभिनेत्री लवकरच एका नवीन भूमिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. रश्मिकाने सोशल मीडियावर नुकतीच एक नवीन पोस्ट शेअर केली आहे. यामधून अभिनेत्रीने तिच्या नवीन चित्रपटाचं पोस्टर शेअर केलं आहे. रश्मिकाने इन्स्टाग्रामवर शेअर केलेल्या पोस्टने सगळ्यांचं लक्ष वेधलं आहे. यामध्ये अभिनेत्री तिच्या आगामी चित्रपटातील लूकमध्ये पाहायला मिळत आहे. रश्मिकाच्या नवीन चित्रपटाचं नाव 'मैसा' असं आहे. रश्मिकाचा या चित्रपटातील लूक उत्सुकता वाढवणारा आहे. अभिनेत्री यामध्ये थरारक लूकमध्ये पाहायला मिळत आहे. नवीन चित्रपटाचं पोस्टर शेअर करत अभिनेत्रीने कॅप्शनमध्ये लिहिलं आहे की, मी नेहमीच काहीतरी नवीन आणि काहीतरी वेगळं करण्याचा प्रयत्न करते. तसंच माझ्या कामामधून प्रेक्षकांची उत्सुकता वाढावी यासाठीही मी प्रयत्नशील असते आणि हा चित्रपटसुद्धा तसाच काहीसा आहे. रश्मिकाने कॅप्शनमध्ये पुढे लिहिलं आहे की, यापूर्वी मी कधीही असं पात्र साकारलं नव्हतं किंवा कधीही असं जग पाहिलं नव्हतं. मी कधीच स्वत:चं असं रूपही पाहिलं नव्हतं. ही भूमिका खूपच वेगळी आहे, त्यामुळे मला सध्या दडपण आलं आहे, पण मी यासाठी तितकीच उत्सुकही आहे; त्यामुळे ही कलाकृती तुम्ही पाहावी आणि तुम्हाला ती आवडेल यासाठी मी खूप उत्सुक आहे. ही तर फक्त सुरवात आहे. रश्मिकाचा 'मैसा' हा आगामी चित्रपट हिंदीसह इतर चार दाक्षिणात्य भाषेत प्रदर्शित होणार आहे. रश्मिकासह या चित्रपटात कोणता अभिनेता तसेच कोणते इतर कलाकार झळकणार हे पाहणं रंजक ठरणार आहे. अद्याप हा चित्रपट कधी प्रदर्शित होणार याबाबत खुलासा करण्यात आलेला नाही.



# राखी सावंतने मल्लिका शेरावतला झापले

शेफाली जरीवालाच्या अचानक झालेल्या मृत्यूने सर्वांनाच धक्का बसला आहे. अभिनेत्रीच्या मृत्यूच्या दुसऱ्याच दिवशी मल्लिका शेरावतने एक व्हिडिओ शेअर केला. यामध्ये ती लोकांना बोटॉक्स आणि फिलरबद्दल काळजी घ्या, असे सांगताना दिसली होती. त्यामुळे तिच्यावर खूप टीका झाली. आता राखी सावंतनेही मल्लिकावर निशाणा साधला आहे आणि तिला खूप झापले आहे. राखी सावंतचं असं म्हणणं आहे की मल्लिका शेरावतने या व्हिडीओद्वारे दिवंगत अभिनेत्री शेफाली जरीवालावर टीका केली आहे. मल्लिकाने नुकताच एक व्हिडिओ शेअर केला होता, ज्यामध्ये ती नॅचरल सौंदर्याचा प्रचार करताना आणि लोकांना बोटॉक्स आणि फिलरबद्दल सावधगिरी बाळगण्यास सांगताना दिसत होती. परंतु यामुळे मल्लिकावर टीकेची झोड उठली. राखी सावंतला मल्लिका शेरावतची ही पोस्ट आवडली नाही. शेफाली जरीवाला तरुण दिसण्यासाठी व्हिटॅमिन सी आणि ग्लूटाथिओन घेत होती. राखीला वाटले की मल्लिकाने शेफालीला टोमणे मारले आहेत. राखीने तिच्या इंस्टाग्राम अकाउंटवर एक व्हिडिओ शेअर केला. यामध्ये ती म्हणाली, मल्लिका शेरावत, वाहत्या गंगेत हात धुवू नकोस. जर तू कोणाचे भले करू शकत नाहीस तर वाईटही करू नकोस. 'भीगे ओठ तेरा प्यासा दिल मेरा, बहुत राते गुजारी हैं' बराच वेळ घालवून तू अमेरिकेत स्थायिक झाली आहेस. त्याच व्हिडीओमध्ये राखी सावंत लोकांना भरपूर खा, पण जिमही करा असे आवाहन करताना दिसली. शेफालीसोबत जे घडले त्यामुळे तिला खूप भीती वाटते असे राखीने म्हटले. ती दुबईमध्ये एकटी राहते. राखीने प्रश्न केला की, कोणाला बारीक का व्हावे लागते आणि इतके बारीक का व्हावे लागते की ते एखाद्याचा जीव घेते. ज्याला ते आवडून घ्यायचे आहे तो आहे तसे करून घेईल. त्याचवेळी, मल्लिका शेरावतने एक व्हिडिओ शेअर केला, ज्यामध्ये ती म्हणत होती, 'मी नुकतीच उठले आणि विचार केला की मी एक सेल्फी व्हिडीओ बनवेन. मी हा व्हिडीओ तुमच्यासोबत शेअर करेन. मी कोणताही फिल्टर वापरला नाही. मी कोणताही मेकअप केलेला नाही. मी माझे केसही विंचरलेले नाहीत. मी हा व्हिडीओ तुमच्या सर्वांसोबत शेअर करत आहे जेणेकरून आपण सर्वजण बोटॉक्स आणि फिलरना नाही म्हणू शकू. निरोगी जीवनशैली स्वीकारा.'

# 'या' अभिनेत्रीने नाकारला होता अमिताभसोबतचा चित्रपट



अभिनेत्री मधुने बॉलिवूड सोडून साऊथ इंडस्ट्रीत जाण्यामागील कारण सांगितले आहे. यासोबतच तिने सांगितले की एकेकाळी ती निराश झाली होती. एक वेळ अशी आली जेव्हा तिला बॉलिवूडचे दिग्गज अभिनेते अमिताभ बच्चन यांच्यासोबत एक चित्रपट ऑफर करण्यात आला आणि तिने तो नाकारला. चला जाणून घेऊया ती काय म्हणाली. अभिनेत्री मधु नुकतीच म्हणाली, 'मला वाटले की मी चांगले काम करत नाहीये आणि आता मी माझ्या कामाबद्दल उत्साहित नाहीये. साऊथ इंडस्ट्रीमध्ये प्रामाणिक, वास्तववादी दिग्दर्शकांसोबत काम केल्यानंतर, अशा दिग्दर्शकांसोबत काम करणे विचित्र वाटले जे बोर्ड लावायचे आणि दाखवायचे की आपण दुसरीकडे कुठेतरी आहोत आणि चित्रपटांमध्ये फसवणूक करायची. एक कलाकार म्हणून, मी सेटवर जाण्याने नाखूष होऊ लागलो. मला एकेकाळी सर्वात जास्त हव्या असलेल्या गोष्टी म्हणजे चित्रपटाच्या सेटवर असणे, मला त्रास देऊ लागले.' पुढे बोलताना, अभिनेत्रीने सांगितले की जेव्हा तिला समजले की तिला चित्रपटांमध्ये काम करायचे नाही, तेव्हा तिने लग्न केले आणि अभिनयापासून दूर गेली. ती म्हणाली, 'एकदा मला लोभ आला, तेव्हा मला अमिताभ बच्चनसोबत एक मोठा चित्रपट मिळाला. जो नंतर सौंदर्याकडे गेला. माझ्या लग्नाची तारीख निश्चित झाली आणि मी माझ्या सेक्रेटरीला सांगितले की मला हा चित्रपट करायचा नाही. त्याने मला पुनर्विचार करण्यास सांगितले, पण मी ठाम राहिलो.' तथापि, तिने 'सूर्यवंशम' चित्रपटादरम्यानचा एक किस्सा शेअर केला आहे, ज्यामध्ये सौंदर्या बिग बींसोबत मुख्य भूमिकेत होती. अभिनेत्रीच्या कारकिर्दीबद्दल बोलायचे झाले तर, तिने १९९१ मध्ये आलेल्या 'फूल और कांटे' या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पदार्पण केले.

# ईशा गुप्ताची 'धमाल ४' मध्ये एंट्री

'हाउसफुल ५'नंतर बॉलिवूडमध्ये अनेक कॉमेडी फ्रेंचाइजीशी निगडित चित्रपट प्रदर्शित होणार आहेत. यात अजय देवगणची मुख्य भूमिका असलेला चित्रपट 'धमाल ४' सामील आहे. या चित्रपटात दिग्गज कलाकार काम करत आहेत. आता यात एका अभिनेत्रीचा समावेश झाला आहे. धमाल ४ मध्ये अभिनेत्री ईशा गुप्ताला संधी मिळाली आहे. धमाल ३ चित्रपटात तिने प्राची नावाची भूमिका साकारली होती. आता चौथ्या भागात तिच्या एंट्रीची पुष्टी दिग्दर्शक इंद्र कुमार यांनी दिली आहे. ईशा गुप्ता धमाल ४ मध्ये परतल्याने आम्ही आनंदी आहोत. ती एक उत्तम कलाकार आहे. तिच्यासोबत काम करणे आनंदाची बाब असल्याचे इंद्र कुमार यांनी म्हटले आहे. 'धमाल ४' चित्रपटात ईशाची भूमिका मोठी असल्याचे सांगण्यात येत आहे. परंतु तिच्या व्यक्तिरेखेबद्दल सध्या अधिक माहिती देण्यात आलेली नाही. हा चित्रपट पुढील वर्षी मे महिन्याच्या आसपास प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटात रितेश देशमुख, अर्शद वारसी, संजय मिश्रा, जावेद जाफरी आणि संजीदा शेख हे कलाकार महत्त्वाच्या भूमिकेत आहेत.



मराठी चित्रपटसृष्टीत सध्या 'मना'चे श्लोक' या आगामी चित्रपटाची जोरदार चर्चा आहे. गेल्या काही दिवसांपासून मृण्मयी देशपांडे सहा नायकांसोबत दिसणार असल्याची चर्चा सोशल मीडियावर रंगत होती. आता अखेर या चर्चेला पूर्णविराम देत नवीन पोस्टर प्रेक्षकांच्या भेटीला आले आहे.




# 'मना'चे श्लोक'चे भन्नाट पोस्टर प्रदर्शित

या चित्रपटाचे पोस्टर पाहून 'मना'चा श्लोक कोण आहे, याचा अंदाज येतोय. दोघांच्या चेहर्‍यावरील हावभाव खूप काही सांगत आहेत. आता दोघांचं नातं नक्की काय आहे? लग्न, नातं यांबद्दल त्यांचे विचार काय आहेत, का मतभेद आहेत, हे पाहायला आता प्रेक्षक उत्सुक झाले आहेत. चित्रपटात मृण्मयी आणि राहुलसोबत पुष्कराज चिरपुटकर, सुव्रत जोशी, सिद्धार्थ मेनन, हरीश दुधाडे आणि करण परब हे कलाकारही झळकणार आहेत.

चित्रपटाची दिग्दर्शक मृण्मयी देशपांडे सांगते, 'मना'चे श्लोक ही गोष्ट आहे मनवा आणि श्लोक या दोघांची. त्यांच्या नात्यातून, त्यांच्या बोलण्यातून, त्यांच्या असण्यातून, त्यांची आयुष्याबद्दलची मतं, वेगवेगळे विचार हे सगळ्यांना ओळखीचे वाटतील.

लग्नासारख्या विषयावर प्रत्येकाचं काही ना काही मत असतं. कुणाचं ठाम, कुणाचं गोंधळलेलं. या गोष्टी अनेकांनी अनुभवलेल्या असतील तर कोणी अनुभवेल. मी आताच सांगणार नाही की, चित्रपट कोणत्या वळणावर जाईल, परंतु मला खात्री आहे की प्रेक्षक मनातल्या मनात हसतील आणि म्हणतील, 'हे तर अगदी माझ्यासारखं आहे!' म्हणूनच हे 'मना'चे श्लोक म्हणजे तुमच्याच मनातले विचार आहेत.

चित्रपटाचे निर्माते संजय दावरा म्हणतात, मराठीत पहिल्यांदाच पाऊल टाकतोय. 'मना'चे श्लोक'सारख्या संकल्पनेतून सुरुवात होणं माझ्यासाठी खास आहे. सह-निर्माते श्रेयश जाधव सांगतात, हा चित्रपट एक वेगळी झलक घेऊन येतोय. मृण्मयीचं दिग्दर्शन आणि ती ज्या पद्धतीने गोष्टी टिपते, त्यातून प्रेक्षक नक्की रिलेट होतील. गणराज स्टुडिओ आणि संजय दावरा एक्सपरिअन्स निर्मित, नितीन वैद्य प्रॉडक्शन्स प्रस्तुत 'मना'चे श्लोक' या चित्रपटाचे लेखन आणि दिग्दर्शन मृण्मयी देशपांडे यांनी केले असून, हा चित्रपट १ ऑगस्ट रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.



# कोकणच्या लाल मातीतला 'दशावतार' येतोय

शिवरा चिमणराव, श्रीयुत गंगाधर टिपरे, चिंची चेटकीण, चौकट राजा, तात्या विंचू या आणि अशा अनेकविध भूमिकांना मालिका, रंगभूमी आणि चित्रपटाच्या पडद्यावर सजीव करणारे नटश्रेष्ठ दिलीप प्रभावळकर वयाच्या या टप्प्यावर पुन्हा एका नव्या अवतारात रूपेरी पडद्यावर रसिकांच्या भेटीला येण्यासाठी सज्ज झाले आहेत.

दशावतार या निसर्गरम्य कोकणच्या पार्श्वभूमीवर बनलेल्या, एका सस्पेन्स थ्रिलर भव्य चित्रपटात ते अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका साकारत आहेत. आजवरच्या त्यांच्या भूमिकांपेक्षा ही वेगळीच भूमिका असणार आहे. झी स्टुडियोज् प्रस्तुत ओशन फिल्म कंपनी आणि ओशन आर्ट हाऊस निर्मित दशावतार हा चित्रपट कोकणातील अद्भुत निसर्ग, तिथल्या रूढीपरंपरा, मान्यता, लोककला यांचे मनोरम्य दर्शन घडवणारा आणि तितकीच त्याला गूढ, उत्कंठावर्धक, वेगवान, थरारकथेची जोड असलेला हा चित्रपट आहे. या चित्रपटाची कथा, पटकथा लेखन आणि दिग्दर्शन सुबोध खानोलकर यांनी केले आहे.

चित्रपटाची निर्मिती सुजय हांडे, ओंकार काटे, सुबोध खानोलकर, अशोक हांडे, आदित्य जोशी, नितिन सहस्रबुद्धे, मृणाल सहस्रबुद्धे, संजय दुबे, विनायक जोशी यांनी केली आहे. तर चित्रपटाचे कलानिर्माते अजित भुरे असून कोकणात घडणाऱ्या गूढ कथेवर दशावतार चित्रपटाची बांधणी करण्यात आली आहे. १२ सप्टेंबरला हा चित्रपट रूपेरी पडद्यावर झळकणार आहे. याची पहिली झलक लवकरच झी मराठीवर रसिकांना पाहायला मिळणार आहे.

# मृण्मयी देशपांडे दिग्दर्शकाच्या भूमिकेत



अभिनेत्री मृण्मयी देशपांडे हिने आजवर अनेक मराठी चित्रपटात वेगवेगळ्या विषयांवर असलेल्या चित्रपटात काम केले आहे. आता मृण्मयी अभिनयासोबतच दिग्दर्शकाच्या भूमिकेत पाहायला मिळणार आहे. तिच्या आगामी चित्रपटाचे नाव 'मना'चे श्लोक असे असून, या चित्रपटाचे पोस्टर तिने स्वतः इन्स्टाग्रामवर शेअर केले आहे. या चित्रपटाचे लक्षवेधक पोस्टर पाहून सोशल मीडियावर 'मना'चे श्लोक चित्रपटाची जोरदार चर्चा रंगली आहे. 'मना'चे श्लोक चित्रपटाच्या पहिल्याच लक्षवेधक पोस्टरमध्ये 'मना'चा श्लोक कोण आहे, याचा अंदाज येत आहे. पोस्टरमधील दिसणारे मनवा आणि श्लोक यांचे चेहऱ्यावरील भाव खूप काही सांगून जात आहेत. दोघांचं नातं नक्की काय आहे? असा प्रश्न प्रेक्षकांना पडला असून हे पाहायला प्रेक्षक खूप उत्सुक झाले आहेत. ही आहे 'मनवा' आणि हा आहे 'श्लोक' .. पण मनवाच्या 'मनात' आहे का श्लोक? हे हसत नाहीयेत, एकमेकांशी बोलत नाहीयेत.. काहीतरी झालं आहे नक्की! काय झालं आहे ते लौकरच कळेल, पण 'मन' जुळेल? असे हटके कॅप्शन या पोस्टरच्याखाली मृण्मयीने दिले आहे. यामुळे 'मना'चे श्लोक चित्रपटाची उत्सुकता खूप वाढली आहे. या चित्रपटात मृण्मयी आणि राहुलसोबत पुष्कराज चिरपुटकर, सुव्रत जोशी, सिद्धार्थ मेनन, हरीश दुधाडे आणि करण परब या कलाकारांच्याही भूमिका असणार आहेत. गणराज स्टुडिओ आणि संजय दावरा एक्सपरिअन्स निर्मित, नितीन वैद्य प्रॉडक्शन्स प्रस्तुत 'मना'चे श्लोक' या चित्रपटाचे लेखन आणि दिग्दर्शन मृण्मयी देशपांडे हिने केले आहे. हा चित्रपट १ ऑगस्ट रोजी थिएटर्समध्ये रिलीज होणार आहे.

# चित्तवृत्तींना उजाळा देणारे संगितद्वय: हुस्नलाल- भगतराम



**खूशियो के दिन मनाये जा। दिलके तराने गाये जा।।.... लता मंगेशकर यांनी १९५१ सालच्या 'अफसाना' चित्रपटात 'हुस्नलाल- भगतराम' यांच्या संगीतात गायलेले हे मधूर गीत एकेकाळी रेडिओ सिलोनच्या 'हमेशा जवा हूँ' या गीतांच्या रंगारंग कार्यक्रमात 'सिग्नेचर ट्यून' म्हणून वाजवली जायची. बोलपटाच्या आरंभानंतर पहिल्या १० वर्षांतच चित्रपट संगीताने चांगले बाळसे धरले होते. हुस्नलाल- भगतराम या बंधुद्वयांनी हिंदी चित्रपटातील वाद्य वृंदात ढोलक व मटका या तालवाद्याचा अभिनव प्रयोग करून अभिजात संगीत दिले.**

सुनो १९४९ सालच्या 'बडी बहन' चित्रपटात लता व प्रेमलता यांनी गायलेल्या या गाण्यात संगीतकारांनी हार्मोनियमच्या विविध तुकड्यांचा प्रयोग करून हे गाणे व संगीत खेळकर बनवून संपूर्ण देशभर लोकप्रिय केले. लग्नसमारंभ आटोपल्यावर घरी नवरा व नवरीची या गाण्याद्वारे थट्टा करून कौटुंबिक आनंद घेत असत. 'वो पास रहे या दूर रहे खनजरोमे समाये रहते है...' याच चित्रपटात हे कर्णमधुर गीत सुरय्या यांच्याकडून गाऊन घेतले. प्रत्यक्ष संवादाचा योग न येता केवळ सान्निध्यात राहून हुरहुरी निर्माण होणे यालाच प्रेम म्हणतात का? अशी एकछद्मी गोड पृच्छा गाण्यातून करतात.

'चले जाना नही नैन मिलाके हाये! सैया बेदर्दी, सैया बेदर्दी...' याच चित्रपटातील हे गाणे गीता बाली या नटखट अभिनेत्रीच्या अभिनयाला साजेसे लता मंगेशकरांनी गायिले होते. लता व रफी यांनी १९५० साली 'मीनाबाजार' चित्रपटात दुपट्याच्या बहाण्याने केलेली हलकीशी छेडछाड मजेशीर दिसून येते. १९५४ सालचे हे गाणे 'शमा परवाना' चित्रपटासाठी रफी व सुरय्या यांनी अतिशय वेगळ्याच पद्धतीने गान अभिनव प्रयोग केला आहे. प्रत्येक अंतऱ्यानंतरची आलापी अतिशय हलक्या स्वरात खुबीने म्हणवून घेत समा साधली आहे. त्यामुळे गाण्यातील गोडी वाढली. हुस्नलाल- भगतराम या जोडगोळीच्या आधी 'आलमआरा' चित्रपटात फिरोझशहा मिस्त्री व बी. इराणी तसेच १९४१ साली 'नया संसार' चित्रपटात सरस्वती देवी व रामचंद्र पाल या जोडगोळींनी संगीत दिले होते. हुस्नलाल- भगतराम यांच्याकडे शंकर (शंकरसिंग रघुवंशी) पुढील काळातील शंकर-जयकिशन जोडीतील एक हे हार्मो नियम वाजवायचे.

लक्ष्मीकांत प्यारेलाल, खय्याम, महेंद्र कपूर, एस मोहिंदर आदींनी व्हायोलीन व गायकीचे प्रशिक्षण घेतले. इतकेच नाही, तर मोहम्मद रफी सुरुवातीच्या काळात त्यांच्याकडे तानपुरा घेऊन रियाझ करायचे. पुढील काळात शंकर-जयकिशन व लक्ष्मीकांत-प्यारेलाल हे महान संगीतकार बनले. या जोडींचे आदर्श मात्र हुस्नलाल-भगतराम होते. या तीनही दिग्गज जोडीच्या काळात लता व रफींनी दिग्विजय प्राप्त केला. १९४८ साली महात्मा गांधी यांच्या वधानंतर केवळ दोन दिवसात गीतकार राजेंद्र कृष्ण यांनी खालील गाणे लिहिले व हुस्नलाल- भगतराम यांनी तत्परतेने ते संगीतात बांधून मोहम्मद रफींकडून अतिशय आर्त स्वरात गाऊन घेतले. या गाण्याने देशभरातील जनतेच्या भावना उचंबळून आल्या. 'सुनो सुनो ऐ दुनियावालो बापूजी की अमर कहाणी' हे ते गाणे होय. 'ये मेरी तरफ यूं चले आ रहे है। कि अरमान धडकन से टकरा रहे है' किशोर यांचे हे मनमोहक गाणे याच चित्रपटात हुस्नलाल-भगतराम यांची किमया आहे.

'छोटासा फसाना है, तेरे मेरे प्यारका, हो तेरे मेरे प्यार का। और भी तराना है, तेरे मेरे प्यारका, हो तेरे मेरे प्यार का।।' 'बिरहा की रात' या १९५० सालच्या चित्रपटातील लता व रफी यांनी गायलेली व हुस्नलाल- भगतराम यांनी संगीतात बांधलेली ही युगल गीताची रचना कोण विसरेल? हे सर्व संगीत केवळ डिव्हाईन आहे. मानवी चित्तवृत्तींना जन्म देणारे आहे. त्या काळातील क्रेज सांभाळून संगीत देणारे हुस्नलाल-भगतराम हे अखेरचे संगीतकार होते. या जोडगोळीने सुरय्या या गायिका अभिनेत्रीच्या नऊ चित्रपटांना संगीत दिले आहे. रसिकांच्या स्मृतीचे दरवाजे उघडावे म्हणून या संगीतकार जोडीने संगीत दिलेल्या चित्रपटांचे व गाण्यांचे वर्णन करण्याचा प्रयत्न केला आहे.

हुस्नलाल यांचा जन्म ८ एप्रिल १९२० रोजी व भगतराम यांचा जन्म १९१४ साली पंजाबमधील जालंदर जिल्ह्यातील काहमा येथे झाला. हे दोघेही बंधुद्वय आहेत. हुस्नलाल हे प्रसिद्ध व्हायोलीन वादक, गायक (शास्त्रीय संगीत) व संगीतकार होते.

भगतराम हे प्रसिद्ध हार्मोनियमपटू होते. या दोघांनीही दिल्लीचे पं. दिलीपचंद्र वेदी यांच्याकडे रीतसर संगीताचे प्रशिक्षण घेतले. त्यांचे वडील बंधू पं. अमरनाथ हे ४० च्या दशकातील आघाडीचे संगीतकार होते. हे दोघेही त्यांचे सहायक होते. 'मिर्झा साहिबा' चित्रपटात संगीत देताना अमरनाथ यांचे निधन झाले. हुस्नलाल व भगतराम यांनी उरलेले संगीत दिग्दर्शित केले. तीन संगीतकारांनी मिळून संगीत दिलेला हा पहिला चित्रपट होता. १९४४ साली प्रभात कंपनीचा 'चाँद' हा या जोडीने संगीत दिलेला पहिला चित्रपट होता. तर, 'दो दिलों को ये दुनिया मिलनेही नही देती' हे गाणे गायिका अभिनेत्री मंजू यांनी गायलेले पहिले गाणे ठरले. शास्त्रीय संगीताच्या राग रागिणीवर आधारित पंजाबी धूनचे मिश्रण करून व गुणगुणायला सहज व सोप्या गोड चालीत त्यांनी संगीत दिले.

१९४४ ते १९५५ ही त्यांची खऱ्या अर्थी संगीत कारकीर्द होती. त्यानंतर दुय्यम दर्जाचे ॲक्शन, स्टंट व पौराणिक चित्रपट केलेत. १९६६ सालचा 'शेर अफगाण' हा शेवटचा चित्रपट होता. त्यानंतर त्यांच्यावर आपल्याच शिष्याच्या हाताखाली वाद्ये वाजविण्याची वेळ आली. नियतीने त्यांची क्रूर थट्टाच जणू केली. हुस्नलाल दिल्लीला आकाशवाणीच्या सेवेत रुजू झाले व भगतराम मुंबईत छोटे- मोठे स्टेज कार्यक्रम करू लागले. २८ डिसेंबर १९६८ रोजी दिल्लीला हुस्नलाल यांचे निधन झाले. लहान भावाच्या निधनानंतर भगतराम पार खचले व १९७३ साली मुंबईत त्यांचीही प्राणज्योत मालवली. या एक काळ गाजरिणाऱ्या मातब्बर संगीतकार जोडीच्या चित्रपटातील योगदानाच्या आठवणीसाठी तसेच नवीन पिढीला त्यांची माहिती व्हावी, यासाठी हा सारा खटाटोप.

**रमेश पोफळी**

# 'वॉर ड्रामा'मध्ये दिसणार चित्रांगदा सिंह



'अपूर्व लखिया पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर युद्धकथा घेऊन येत आहे. या चित्रपटात सलमान खान मुख्य भूमिका साकारणार आहे. तर आता यातील नायिकेचे नाव समोर आले आहे. सलमान खान पहिल्यांदाच एखाद्या सैन्याधिकाऱ्याची व्यक्तिरेखा साकारणार असल्याचे त्याचे चाहते उत्सुक झाले आहेत. या चित्रपटात चित्रांगदा सिंह ही नायिका असणार आहे. सलमानपेक्षा १० वर्षांनी लहान असणाऱ्या चित्रांगदासाठी ही मोठी संधी असणार आहे. चित्रांगदाने २००५ साली 'हजारों ख्वाहिशें ऐसी' या चित्रपटाद्वारे बॉलिवूडमध्ये पदार्पण केले होते. तर तिला खरी ओळख 'देसी बॉयज' या चित्रपटाद्वारे प्राप्त झाली होती. अलिकडेच तिने अक्षय कुमारसोबत 'हाउसफुल ५' या चित्रपटात काम केले आहे. अपूर्व लखियाचा आगामी चित्रपट गलवान खोऱ्यातील चीनसोबतच्या संघर्षावर आधारित असणार आहे. या चित्रपटात सलमान खान हा हुतात्मा कर्नल संतोषबाबू यांची व्यक्तिरेखा साकारणार आहे.

# विद्या बालनने अक्षय खन्नासोबत काम करण्यास दिला होता नकार





विद्या बालन ही बॉलीवूडमधील प्रसिद्ध अभिनेत्री आहे. तिने 'परिणीता' या २००५ साली आलेल्या चित्रपटातून बॉलीवूडमध्ये पदार्पण केलं होतं. यानंतर तिने अनेक गाजलेल्या चित्रपटांमध्ये काम केलं. विद्याला अभिनयाचा कोणताही वारसा नसताना तिने तिच्या कलेच्या जोरावर इंडस्ट्रीमध्ये स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केली. विद्याने एकाच पठडीतल्या भूमिकांमध्ये न रमता वैविध्यपूर्ण भूमिकांना पसंती दिली, त्यामुळे तिने निवडलेल्या भूमिका व चित्रपट यासाठी चाहत्यांनी नेहमी तिचं कौतुक केलं.

आपल्या खंबीर भूमिकांमधून प्रेक्षकांच्या भेटीला येणारी विद्या खऱ्या आयुष्यात मात्र एक वेगळाच संघर्ष करत होती. अभिनेत्रीने नुकत्याच दिलेल्या मुलाखतीमध्ये सांगितलं की, इंडस्ट्रीत नवीन असताना ती स्वत:च्या निर्णयांवर शंका घेत असे आणि तिला कोणालाही नाही म्हणणं कठीण जायचं. विद्या बालनने एका मुलाखतीमध्ये याबाबत सांगितलं आहे. ती म्हणाली, करिअरच्या सुरुवातीच्या काळात तिला एखाद्या चित्रपटाला नाही म्हणणं जमायचं नाही.

यादरम्यान तिने 'छावा' फेम अभिनेता अक्षय खन्नाबरोबरच्या चित्रपटाचा एक किस्सा सांगितला आहे. विद्या या मुलाखतीमध्ये म्हणाली, मला आता ही गोष्ट खूप सोपी वाटते, पण २० वर्षांपूर्वी मला भीती वाटायची. मला आजही आठवतं की, अक्षय खन्नाची मुख्य भूमिका असलेल्या एका चित्रपटासाठी मला विचारणा झाली होती. अभिनेत्री याबाबत पुढे म्हणाली, काही कारणांमुळे मला ती कथा आवडली नव्हती. पण, मी स्वत: फोन करून दिग्दर्शकाला असं सांगू शकत नव्हते, म्हणून मी माझ्या मॅनेजरला फोन करून याबाबत बोलायला सांगितलं. पण हे इथेच संपलं नाही. नंतर जेव्हा आम्ही 'सलाम ए इश्क'च्या सेटवर भेटलो, तेव्हा अक्षय खन्ना मी घाबरेन या हेतूने माझी मस्करी करत म्हणाला, तुला चित्रपट काम करायचं नव्हतं हे तू मला का नाही सांगितलंस. पण, तेव्हा मी खरंच इतकी घाबरले होते की मी जॉन अब्राहमकडे मदत मागितली होती.

# रणदीप हुड्डा झळकणार नवीन चित्रपटात

बॉलीवूड अभिनेता रणदीप हुड्डाने नुकतीच सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली आहे. त्यामध्ये अभिनेता एका वेगळ्याच लूकमध्ये पाहायला मिळत आहे. त्यामुळे त्याच्या चाहत्यांमध्ये नवीन चित्रपटाबद्दलच्या चर्चा सुरू झाल्या आहेत. रणदीप त्याची प्रत्येक भूमिका चोख पार पाडतो. २०२४ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'स्वातंत्र्यवीर सावरकर' या चित्रपटातील त्याच्या भूमिकेसाठी त्याचं अनेकांकडून कौतुक करण्यात आलं होतं. या चित्रपटासाठी त्यानं स्वत:वर खूप मेहनत घेतली होती. तो त्याच्या प्रत्येक भूमिकेसाठी खास मेहनत घेत असतो.

रणदीपने शेअर केलेली ही पोस्ट त्याच्या नवीन चित्रपटातील भूमिकेसंबंधित आहे का, असा प्रश्न त्याच्या चाहत्यांना पडला आहे. या पोस्टला अभिनेत्याने दिलेल्या कॅप्शनने लक्ष वेधले आहे. तर त्याने नुकत्याच शेअर केलेल्या या पोस्टमध्ये त्याचा वेगळाच लूक पाहायला मिळतोय. त्याने त्याचे अर्धे टक्कल असलेला फोटो शेअर केला आहे. त्यासह त्याच्या चेहऱ्यामध्येही थोडा बदल जाणवत आहे. त्यामुळे हा लूक त्याच्या नवीन चित्रपटातील भूमिकेसाठी आहे का, असा प्रश्न निर्माण झाला आहे. रणदीपने इन्स्टाग्रामवर पोस्ट केलेल्या या फोटोखाली प्रेक्षकांनी कमेंट्स केल्याचे पाहायला मिळते. एका नेटकऱ्याने या पोस्टखाली हा लूक नवीन बायोपिकसाठी आहे का असे म्हटले आहे. दुसऱ्याने, नवीन प्रोजेक्ट, अशी कमेंट केली आहे. काहींनी तो सुभाषचंद्र बोस यांचा चरित्रपट बनवणार आहे का अशा कमेंट्सही केल्या आहेत. एकूणच त्याचे चाहते या लूकमागचे कारण जाणून घेण्यासाठी उत्सुक असल्याचे पाहायला मिळत आहे. रणदीप हुड्डाने

२०२४ मध्ये प्रदर्शित झालेल्या स्वातंत्र्यवीर सावरकर या चित्रपटासाठी स्वत:मध्ये अनेक बदल केल्याचे सांगितले होते. या चित्रपटासाठी त्याने २८ दिवसांत १८ किलो वजन कमी केले. या भूमिकेसाठी त्याने आहारातही लक्षणीय बदल केले होते. त्याबाबत त्याने मागे एका मुलाखतीमध्ये माहिती दिली होती. रणदीप प्रत्येक भूमिकेला त्याचे शंकर टक्के देण्याचा प्रयत्न करतो आणि कामाप्रति त्याची शिस्त यांसारख्या गोष्टींमुळेच तो प्रत्येक भूमिका चोख पार पाडतो. यासाठी त्याचे चाहते त्याचे कौतुक करतात. दरम्यान, रणदीपच्या कामाबद्दल बोलायचे झाल्यास तो 'जाट' चित्रपटातून झळकला होता. त्यामध्ये त्याच्यासह अभिनेता सनी देओलही महत्त्वपूर्ण भूमिकेत पाहायला मिळाला. त्यांच्या या चित्रपटाला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळाला होता.

